| Publication | Edition | Date | Subject |
|---|---|---|---|
| Saamna | Pune | 31/08/2018 | LIFFI 2018 |

# लोणावळा येथे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

पुणे : आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन ७ ते ९ सप्टेंबर या कालावधीत लोणावळा येथील ट्रिओसे प्लाझा येथे करण्यात आले आहे. १८ चित्रपट, २ चित्रपट निर्मात्यांच्या चर्चासत्रासह ३ कार्यशाळा ही या महोत्सवाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. तसेच दिग्दर्शक बिमल रॉय यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्यांच्या सहा चित्रपटांचे आणि त्यांच्यावरील लघुपटाचे सादरीकरण होणार आहे. या महोत्सवाचे संचालक माधव तोडी असून, विवेक वासवानी प्रमुख आहेत. तसेच अल्ट्रा मीडिया आणि इंटरटेन्मेंट प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुशीलकुमार अगरवाल हे या महोत्सवाचे आश्रयदाते आहेत. बिमल रॉय यांचे 'सुजाता', 'बंदिनी', 'मधुमती' यांसारखे तसेच 'न्यूड', 'कच्चा लिंबू', 'डॉ. रखमाबाई' यांसारखे मराठी चित्रपट दाखविण्यात येणार आहेत.